2593

994

वाचले/- १] जमावंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख [ म. राज्य. ] पुणे यांचेकडील
क्र. एल. आर. ११५३/ ल-२ /दिनांक १८.४.९०.

२] जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख [म. राज्य. ] पुणे यांचेकडील
क्र. एल. आर. २२७/२०/ ल-३ /१९९२, पुणे दिनांक २३.६.१९९२.

३] जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख [म. राज्य. ] पुणे यांचेकडील
क्र. एल. आर. ११५३/सी. आर. ३१८५/ल-२/९२, दिनांक १.८.१९९२.

---

क्रमांक: एल. आर. ११५३/ल-२/१९९४,
पुणे, दिनांक ३.६.१९९५

<u>दुरुस्ती परिपत्रक:</u>

या कार्यालयाचे परिपत्रक क्रमांक एल. आर. ११५३/ल-२, पुणे दिनांक १८.४.९० चे परिपत्रकासंबंधी काही लोक प्रति[illegible] परिपत्रकातील सूचना अंमलात आणणेकामी, येणाऱ्या अडचणीसंबंधी या कार्या[illegible] दिली आहेत. त्या अनुषंगाने सदर परिपत्रकाचे कायद्यातील तरतुदींचे अनुषंगाने पुनर्विलोकन करण्यात येऊन खालीलप्रमाणे सुधारीत सूचना पारीत करण्यात येत आहेत.

या कार्यालयाकडील परिपत्रक क्र. एल. आर. ११५३/ल-२, पुणे दि. १८.४.९० अन्वये, पोटहिस्सा व पोटहिस्सा मोजणी फी वसूलीबाबत खालीलप्रमाणे सूचना पारीत करण्यात आल्या आहेत.

263

"ज्यावेळी सर्व्हेनंबर मध्ये खरेदी, विक्रीने, वाटपाने, वारसाने किंवा इतर कोणत्याही प्रकारे पोटहिस्से पडतात व त्याची वर्दी संबंधीत धारकांनी दिल्यावर कामगार तलाठी यांनी अधिकार अभिलेखांत नोंद घेताना, कोणत्याहीसर्व्हेनंबरमध्ये व त्यातील हिश्यांत जर पोटहिस्सा पडत असेल तर नवीन ७×१२ चे पान न उघडताच त्या त्या सर्व्हेनंबर अगर पोटहिश्यांचे ७×१२ स नोंदी समाईकात घ्याव्यात, व संबंधीत धारकाकडून संबंधीत सर्व्हेनंबर/ हिश्यांचा ७×१२ व सदर ७×१२ वरील समाईकांत नांवे असलेल्या सर्व धारकांची नांवे व पत्ते मोजणीकामी संमती घेवून मोजणी अर्ज घ्यावा. व सदर अर्ज व त्याप्रमाणे सर्व्हेनंबर अगर ६ पोटहिस्सा पर्यंत मोजणी फी २५०/- रुपये घेऊन त्याची पावती खातेदारांस देवून नंतर ००२९ एल आर या लेखाशिर्षाखाली चलनाने २५०/-रुपये भरावेत व सदरचे चलनाची पहिली प्रत खातेदाराचा अर्ज संमती जबाब यासह मोजणीकामी जिल्हा निरीक्षक भूमि अभिलेख

/भूमापन तहसिलदार [ पोटहिस्सा ] यांचेकडे पाठवावी.

वरील सूचना या परिपत्रकान्वये, मागे घेणेत येत असून त्या ऐवजी खालीलप्रमाणे सुधारीत सूचना पारीत करणेत येत आहेत.

[१] ज्यावेळी स.नं./हि.नं. मध्ये खरेदी, विक्रीने, वाटपाने, वारसाने, किंवा इतर कोणत्याही प्रकारे हक्क निर्माण होतात व त्याची वर्दी ,धारकाने दिल्यावर कामगार तलाठी यांनी नवीन ७×१२ चे पान न उघडताच त्या त्या सर्व्हेनंबर/पोटहिश्याचे ७×१२ स समाईकांत नोंदी घ्याव्यात व त्यानंतर महाराष्ट्र जमिन महसुल अधिनियम १९६६ चे कलम ८५,८७ व कोर्टाचे हुकूमनाम्यावरुन, तसेच मुंबई जमिनीचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करणेबाबत व त्याचे एकत्रीकरण करणेबाबत अधिनियम १९४७ अन्वये, पाडणेत आलेल्या पोटहिश्याबाबत ७×१२ चे नवीन पान तलाठी यांनी उघडावे तसेच सदर बाबत गांव नमुना नंबर ६ ला नोंद घेताना नवीन पाडण्यांत आलेल्या पोटहिश्याचे क्षेत्र व आकार हा तात्पुरता नमूद केला असून तो फाळणी बाराप्रमाणे कायम करणेस पात्र राहील अशी नोंद घेणेत यावी. वर नमूद केल्याप्रमाणे, नवीन पडलेल्या पोटहिश्यांची तसेच संपादन एकत्रीकरण, मळईची जमीन,पाण्याने वाहून गेलेली जमिन याबाबत तलाठी यांनी गांव नमुना नंबर ६ ड मध्ये संकलीत केलेली पोटहिश्यांची माहिती गांव नमुना ६ड चे नमुन्यात संबंधी ७×१२ चे प्रतिसह व रेखाचित्रासह तहसिलदार यांचेमार्फत जिल्हा निरीक्षक भूमि अभिलेख/भूमापन तहसिलदार [पोटहिस्सा] यांचेकडे पाठवावी.

[२] वरील परिच्छेद१ मध्ये नमूद केल्याप्रमाणे तहसिलदार यांचेकडून माहिती प्राप्त झालेवर जिल्हा निरीक्षक भूमि अभिलेख/ भूमापन तहसिलदार [पोटहिस्सा] यांनी पोटहिस्सा मोजणीचे काम महाराष्ट्र जमिन महसुल [ महसूली भूमापन व भूमापन क्रमांकाचे उपविभाग] नियम १९६९ मधील तरतुदीनुसार करावयाचे आहे.

[३] पोटहिस्सा मोजणी फी आगाऊ वसूल न करता ती महाराष्ट्र जमिन महसुल अधिनियम १९६६ चे कलम १५३ अन्वये, डिमांड पध्दतीने वसूल करणेत यावी.

[४] या कार्यालयाकडील परिपत्रक क्रमांक एल आर २२७/२०/ल-३/९२, पुणे दिनांक २३.६.१९९२ मधील"मोजणी फी चे चलन"हे शब्द आता वगळणेत आले आहेत परिपत्रकातील बाकी सूचना कायम आहेत.

[५] या कार्यालयाचे दुरुस्ती परिपत्रक क्रमांक एल आर ११५३/सी.आर. ३९८७/

३/-

२/-

] यांचेकडे पाठवावी.

मागे घेणेत येत असून त्या ऐवजी खालीलप्रमाणे

ल-२, १९९२ पुणे, दिनांक १.८.१९९२ मधील" परंतु, जिल्हा निरीक्षक भूमि अभिलेख व भूमापन तहकिकदार [ पोटहिस्सा ] यांचेकडून करण्यात येणा-या इतर पोटहिस्सा मोजणी फी वसुलीची कार्यवाही या कार्यालयाचे परिपत्रक क्र. एल.आर. ११५३/ल-२ दिनांक १८.४.९० व एल.आर. २२७/२०/ल-३ /१९९२, दिनांक २३.६.९२ ने दिलेल्या सूचनेप्रमाणे करावयाची आहे" ही सूचना मागे घेण्यात येत आहे. या दुरुस्ती परिपत्रकातील इतर सूचना कायम आहेत.

[६] जिल्हा निरीक्षक भूमि अभिलेख यांचेकडे पोटहिस्सा मोजणीकामी खातेदार आगाऊ मोजणी फी भरुन त्यांचे चलनासह पोटहिस्सा मोजणी कामी अर्ज करतात. ही पध्दत पूर्वीप्रमाणेच चालू राहील.

सदर परिपत्रकातील आदेशाची अंमलबजावणी त्वरीत होणेची आहे.

सही/- [नन्द लाल]
जमाबंदी आयुक्त आणि संचालक,
भूमि अभिलेख [म. राज्य. ] पुणे.

प्रत/- विभागीय आयुक्त [ सर्व ],
प्रत/- जिल्हाधिकारी [ सर्व. ]
प्रत/- उपविभागीय अधिकारी [ सर्व. ]
प्रत/- उपसंचालक भूमि अभिलेख [ सर्व ]
प्रत/- अधिक्षक भूमि अभिलेख / विशेष अधिक्षक भूमि अभिलेख/ एकत्रीकरण अधिकारी [सर्व. ]
प्रत/- जिल्हा निरीक्षक भूमि अभिलेख /भूमापन तहकिकदार [ पोटहिस्सा ]/अप्पर जिल्हा निरीक्षक भूमि अभिलेख/ सहाय्यक एकत्रीकरण अधिकारी/ सहाय्यक एकत्रीकरण अधिकारी तथा नगर भूमापन अधिकारी[ मुंबई ][ शहर मापन ] /विशेष जिल्हा निरीक्षक भूमि अभिलेख तथा नगर भूमापन अधिकारी/चौकशी अधिकारी [सर्व. ]
प्रत /- गांव कामगार तलाठी [ सर्व ] यांना माहितीसाठी व कार्यवाहीस्तव.

"निर्गमित"

सहाय्यक जमाबंदी आयुक्त,
[ भूमापन ] पुणे.